# विद्यार्थ्यांसाठी आरोग्यम् मनसंपदा उपक्रम

**पुणे** : क्विकहिल फाउंडेशन, पंख संस्था आणि पुणे शहर पोलीस यांच्या वतीने आरोग्यम मनसंपदा हा मानसिक आजारांवर जनजागृती करणारा प्रकल्प नुकताच सुरु झाला आहे. हा प्रकल्प इयत्ता आठवी ते महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पुण्यातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. यामध्ये मानसशास्त्रातील तज्ञ व्यक्तींमार्फत माहितीपर सत्रे घेतली जात आहेत.

कोरोनाच्या काळात तीव्रतेने बदलेली दैनंदिनी, ऑनलाईन शिक्षण घेताना उडत असलेली तारांबळ, अभ्यासाचा ताण मोबाईलचे व्यसन, घरातील जवळच्या व्यक्तींचे निधन, घरातील ढासळलेली आर्थिक परिस्थीती अशा अनेक गोष्टींचा मुलांच्या मनावर नकारात्मक परिणाम झाला असून त्यातून ही मुले ताण, चिंता, नैराश्य, निद्रानाश अशांसारख्या मानसिक आजारांना बळी पडत आहेत व वेळीच याचे निदान व यावर उपाययोजना न होऊ शकल्याने अनेक मुले आत्महत्येपर्यंतचे टोकाचे पाऊल उचलत आहेत; म्हणूनच या मुलांना मानसिक आजारांविषयी सखोल माहिती देऊन यांना आजाराची लक्षणे व उपाय या सत्रांमार्फत सांगितले जातात. लोकांना कोणती मानसिक समस्या जाणवत आहे हे ओळखणे शक्य होईल व योग्य वेळेत त्यावर आवश्यक उपाययोजना केल्यामुळे मानसिक आजार वृद्धिंगत होण्याचे प्रमाण कमी होईल.

आकर्षण, छेडछाड, लैंगिक अत्याचार यांना बळी पडल्याने देखील विद्यार्थी दशेतील मुलांना मानसिक समस्यांना तोंड द्यावे लागते आहे त्यामुळे मुलांना असे अनुभव आल्यास त्यांनी पोलिसांची कशी मदत घ्यावी याबाबत पोलीस मुलांशी विश्वासाचा संवाद या सत्रांमधून साधत आहेत व मुलेही त्यांच्या अडचणी पोलिसांपर्यंत पोहोचवत आहेत. क्विकहिल फाउंडेशनच्या अध्यक्ष अनुपमा काटकर यांच्या प्रेरणेतून हा प्रकल्प सुरु झाला. सत्रांदरम्यान पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे हे देखील मुलांशी याविषयावर संवाद साधत आहेत.